# वार्षिक अहवाल
# २०१६-१७

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
## Rambhau Mhalgi Prabodhini

## प्रस्तावना

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची १९८२ साली स्थापना झाली. प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधन ही त्रिसूत्री घेऊन प्रबोधिनी कार्यरत आहे. लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सामाजिक, शिक्षण व सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्या क्षमता संवर्धनाचे उपक्रम नियमितपणे योजण्याचे कार्य प्रबोधिनी प्राधान्याने करत आहे.

या क्षेत्रांमधील प्रतिनिधींची सर्वंकष उन्नती होऊन समाजात आणि पर्यायाने देशामध्ये योग्य परिवर्तन व्हावे, समाजाच्–ाा विविध क्षेत्रांमध्–ो पारदर्शकता व सु–शासनाची समज विकसित व्हावी यासाठीच विविध प्रशिक्षणांची रचना गेली ३५ वर्षे अखंडपणे करण्–ाात –ेत आहे. काही कार्यक्रम हे नियमितपणे योजले जातात, तर काही काळाप्रमाणे रचना करून योजले जातात. समाजाच्या विविध क्षेत्रांतील संस्थांच्–ाा का–िपद्धतीमध्–ो व्यावसायिक दृष्टीकोनास माणुसकीचा स्पर्श दिल्–ाास संस्था अधिक सक्षम बनतात असा प्रबोधिनीचा अनुभव आहे. आणि –ााच भूमिकेतून प्रबोधिनी आपल्–ाा सर्व का–िक्रमांची रचना करत असते. यशदा या महाराष्ट्र शासनाच्या प्रशिक्षण संस्थेबरोबर झालेला सामंजस्य करार, राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाची सहयोगी प्रशिक्षण संस्था म्हणून मिळालेली मान्यता, तसेच राज्–ाशास्त्र विष–ाात पीएच.डी. व एम.ए (संशोधन) करणाऱ्–ाा विद्यार्थ्–ाांसाठी मुंबई विद्यापीठाकडून संशोधन केंद्र म्हणून मिळालेली मान्यता –ाा प्रबोधिनीच्–ाा अहवाल वर्षातील उपलब्धी आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर २०१६–१७ वर्षात विविध प्रशिक्षण, प्रबोधन व संशोधन विषयांवर प्रबोधिनीने केलेल्या उपक्रमांचा वृत्तान्त आपल्या समोर सादर करत आहोत.

**अहवाल वर्षातील कार्यक्रम : संख्यात्मक दृष्टिक्षेप**

| कार्यक्रम | कार्यक्रमांची संख्या | सहभागी संख्या |
|---|---|---|
| प्रशिक्षण | ४९ | ३४९० |
| प्रबोधन | ५१ | ३३६३ |
| संशोधन | २ | ९ |
| आर.एम.पी. इंटरनॅशनल | २ | ६ |
| अन्–ा | १५ | २३६८ |
| **एकूण** | **११९** | **९२३६** |



21-9-2017 final

## १. विशेष कार्यक्रम :

### १.१ राष्ट्रीय परिषद : लोकसहभागातून सुशासन - जन-गण-मन

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने दि. २४-२५ जानेवारी २०१७ रोजी 'लोकसहभागातून सुशासन' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय परिषद योजण्यात आली होती. –ा संकल्पनेला कृतीत उतरविण्–ासाठी स्व–ंसेवी क्षेत्र आणि शासनाची भूमिका व जवाबदारी का–ा आहे व असावी –ाबद्दलची चर्चा सादरीकरणाच्–ा माध्–मातून करण्–ात आली.

या परिषदेचे उद्घाटन मध्य–प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले.

मध्य–प्रदेश सरकारच्–ा 'लाडली लक्ष्मी योजना', तसेच 'नर्मदा स्वच्छता मोहीम' ह्या जनसहभागातून उत्तमपणे साधल्या गेलेल्या योजना शिवराजसिंह चौहान यांनी आपल्या भाषणात मांडल्या.

या परिषदेचे बीज भाषण प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी भारत सरकारच्या ग्राम विकास खात्याचे सचिव जे.एस.माथूर यांच्या उपस्थितीत केले. जन आणि गण (राज्य) यांचे मन जेव्हा जुळते तेव्हा जनसहभागातून सुशासन सुनिश्चित होते, हे त्यांच्या बीजभाषणाचे मुख्य सूत्र होते. सुशासन व लोकसहभाग :– आव्हाने व संधी या सत्रामध्ये हिवरे बाजारचे पोपटराव पवार व इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेस अँड रिसर्चचे (ICSSR) ह्या संस्थेचे सदस्य सचिव व्ही.के.मल्होत्रा यांनी मांडणी केली.

महिला, बाल व उपेक्षित समाजाचे सक्षमीकरण या विषयावरील सत्रात पेट्रोलियम खात्याचे सहसचिव आशुतोष जिंदाल यांनी मांडणी केली. त्–ांनी वर्तमानातील उज्ज्वला योजनेचा गोषवारा तपशिलासह आवर्जून मांडला. याच सत्रात राजस्थानमधील यशस्वी व प्रसिद्ध अशी 'भामाशाह योजना' सहभागींना सांगून या योजनेचे संचालक ओमप्रकाश वैरवा यांनी जनसहभागाच्या यशस्वितेचे महत्त्व पटवून दिले.

पद्मश्री पुरस्कार प्राप्त संत बलबीरसिंह सीचेवाल यांनी ग्रामविकास, पंचायत राज व स्वच्छता या क्षेत्रांमध्–े जनसहभागातून झालेल्या कार्याचे विवेचन केले. त्यांच्या बरोबरच भारत सरकारच्या स्वच्छ भारत योजनेचे संचालक युगल जोशी यांनीही आपले अनुभव व या विषयाचे महत्त्व सहभागींना विदित केले.

स्वयंसेवी क्षेत्रातील लोकसहभागातून सुशासन या सत्रामध्ये झारखंड राज्यातील उद्योगिनी संस्थेचे मुख्याधिकारी अरविंद मलिक, तिसरी सरकार अभियानचे चंद्रशेखर प्राण आणि धुळे जिल्ह्यातील डिजिटल शाळांचे शिल्पकार हर्षल विभांडीक यांनी त्यांचे अनुभव व त्यातून लोकसहभागातून सुशासन कसे साध्य होत गेले याचे सादरीकरण केले. जागतिक पातळीवर विशेषत: इस्त्राएल, बांगलादेश, सिंगापूर या देशांमध्ये लोकसहभागातून उभी राहिलेली अनेक कामे आनंद शेखर, अनय जोगळेकर, शर्मिला ओसवाल, डॉ. मनन द्विवेदी यांनी मांडली.

परिषदेच्या विविध सत्रांमधून पुढे आलेल्या सूचनांचे व प्रमुख मुद्द्–ांचे संकलन समारोप सत्रात सादर केले गेले. समारोप सत्रात प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ.विनय सहस्रबुद्धे, नेहरू स्मृती संग्रहालयाचे व ग्रंथालयाचे संचालक शक्ती सिन्हा व भास्कर फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गांजू आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या राष्ट्रीय परिषदेला देशाच्या १८ राज्यांमधील ८० संस्था तसेच सरकारी क्षेत्राचे मिळून एकूण १९८ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

### १.२ नेतृत्व साधना - ६ :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने सामाजिक-राजकीय क्षेत्रात योगदान देऊ इच्छिणाऱ्या युवा व्यावसायिक व उच्च शिक्षितांसाठी नेतृत्व साधना हा ५ दिवसीय अभ्यासक्रम तयार केला आहे. प्राधान्याने सामाजिक-राजकीय क्षेत्रात सक्रिय होऊ इच्छिणाऱ्यांना आवश्यक त्या विषयांची तोंड ओळख करून होणे हा या नेतृत्व साधनेचा उद्देश आहे. हा अभ्यासक्रम पहिल्यांदा २०१२ मध्ये योजण्यात आला होता व तेव्हा पासून हा अभ्यासक्रम प्रतिवर्षी योजला जातो. या वर्षी -ा मालिकेतील ६वा अभ्-ाासक्रम श्रीनगरच्या शेर-ए-काश्मीर आंतरराष्ट्रीय केंद्रात योजण्यात आला होता. देशभरातून ३२ प्रतिनिधी या अभ्यासक्रमात सहभागी झाले होते. दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, हरयाणा, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यांसह जम्मू-काश्मीरचे १८ प्रतिनिधी नेतृत्व साधना-६ मध्ये सहभागी झाले होते.

जम्मू-काश्मीर राज्याचे उप मुख्यमंत्री निर्मल सिंह आणि पर्यटन व शिक्षण राज्यमंत्री प्रिया सेठी यांच्या उपस्थितीत या प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले.

या प्रशिक्षणात संघ उभारणी, संवाद कौशल्य, निर्णय क्षमता, राष्ट्रीय सुरक्षा, संसदीय लोकशाही, सामाजिक आव्हाने अशा विविध विषयांवर प्रा. सुषमा यादव, डॉ. हितेश वाजपेयी, नितीन गोखले आदी मान्यवरांनी सहभागींना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचा समारोप भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि राज्यमंत्री प्रिया सेठी यांच्या उपस्थितीत झाला. सरहद या काश्मीरमध्ये कार्यरत असणाऱ्या पुणेस्थित संस्थेचे संजय नहार या प्रसंगी उपस्थित होते.

### १.३ खा.विनय सहस्रबुद्धे सन्मान सोहळा :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने शनिवार, दि. १७ सप्टेंबर, २०१६ रोजी एम.आय.जी. क्रिकेट क्लब, बान्द्रे येथे डॉ. विनय सहस्रबुद्धे यांचा सत्कार समारंभ योजण्यात आला होता. १९८८ पासून जुलै २०१६ पर्यंत प्रबोधिनीत का-रित असलेले व त्यातही १९९९ पासून महासंचालक अशी प्रबोधिनीची जबाबदारी सांभाळणारे डॉ. विनय सहस्रबुद्धे यांची जुलै २०१६ मध्ये राज्यसभेवर खासदार म्हणून निवड झाली त्या निमित्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला.

मुंबईतील बान्द्रे येथील एम.आय.जी क्रिकेट क्लबच्या गॅलेक्सी सभागृहात झालेल्या या सन्मान सोहळ्-ाात सुरुवातीला खा.विनय सहस्रबुद्धे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आणि म्हाळगी प्रबोधिनीतील त्यांच्या सहकाऱ्यांच्या भावना व्यक्त करणारा लघुपट सर्वांसमोर प्रदर्शित करण्यात आला. खा.विनय सहस्रबुद्धे यांच्याशी गेली सुमारे ४० वर्षे संबंध असलेल्या डॉ.पी.एम.कामथ यांनी सुरुवातीला आपल्या भावना प्रकट केल्या. तसेच म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे ज्-ोष्ठ सदस्य अरविंद रेगे यांनीही आपले मनोगत व्-ाक्त केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विनय सहस्रबुद्धे यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना विनय सहस्रबुद्धे यांनी प्रबोधिनीच्या वाटचालीचा पट सर्वांसमोर मांडला. अखिल भारती-ा विद्यार्थी परिषदेमुळे आपण इथ पर्यंतची वाटचाल यशस्वीपणे करू शकलो हे त्यांनी आवर्जून सांगितले. तर स्व.प्रमोद महाजनांमुळे आपली दृष्टी व विचार व्यापक होत गेले हे भावुकपणे सांगितले. स्व.गोपीनाथ मुंडे, स्व.वसंतराव भागवत, स्व.वसंतराव पटवर्धन अशा मंडळींमुळे

आपण योग्य प्रकारे काम करु शकलो हे ही त्यांनी नमूद केले.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या संकल्पनेला आकार देण्याचे काम स्व. प्रमोद महाजन यांनी केले. पण हे केवळ एकटयाचे काम नाही. अशावेळी डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी ही संकल्पना मूर्त व आशययुक्त स्वरूपात साकार केली, हे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवात केली. डॉ.विनय सहस्त्रबुद्धे यांची वक्तृत्वशैली सहज, सुंदर व समोरच्–ाा व्–ाक्तीला त्यातून काही घेण्यासाठी प्रेरित करणारी आहे. राजकीय पक्षात काही विचारी लोकांचे असणे महत्त्वाचे आहे आणि डॉ.विनय सहस्त्रबुद्धे यांच्या सारख्यांमुळे पक्षाला ध्येय, धोरणे आणि दिशा मिळण्यास शक्य होते. या सर्व क्षमतांमुळेच त्यांची निवड राज्यसभेवर करण्यात आली आहे. राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रतिमेत बदल करण्याची भूमिका डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी पार पाडावी ही अपेक्षा व्यक्त करत व त्यांना संसदीय वाटचालीच्या शुभेच्छा देत मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणाचा शेवट केला. विविध क्षेत्रांतील मान्यवर व प्रबोधिनीचे हितचिंतक मिळून सुमारे २०० जण या सत्कार समारंभास उपस्थित होते.

### १.४ दादरा-नगर हवेली मुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार :

दादरा-नगर हवेली मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्–ा सैनिकांना प्रबोधिनीच्यावतीने स्वा. वीर सावरकर ज–ांतीच्–ाा पूर्व संध्–ोला म्हणजे दि. २७ मे, २०१६ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते मानपत्र-शाल-श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. पोर्तुगिजांच्या ताब्यातील दादरा-नगर हवेली मुक्त करण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला त्यातील ३० जण आज हयात आहेत आणि स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून त्–ांनी केलेल्या संघर्षाची योग्य दखल घेतली जावी यासाठी प्रबोधिनीच्या वतीने हा सन्मान सोहळा राजभवनात आयोजित करण्यात आला होता.

आयुष्यभर सावरकरांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्–ाा व त्या विचारांवर आयुष्य जगणाऱ्या सावरकरव्रतींचा सत्कारही राज्यपालांच्या हस्ते करण्यात आला. दिवंगत ज.द.जोगळेकर, शंकरराव गोखले, अरविंद कुळकर्णी, अनुराधा खोत, प्रदीप (बाबा परूळेकर) आणि विद्याधर ठाणेकर अशा एकूण ६ सावरकरव्रतींचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला.

### १.५ प्रबोधिनीच्या पुढाकाराने जिल्हा परिषद शाळांचे संगणकीकरण

हर्षल विभांडिक हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकर्ते आहेत. तुलनेने अप्रगत अशा धुळ्–ाासारख्–ाा भागात त्–ांनी आपले शाले–ा शिक्षण पूर्ण केले आहे. अभियंता पदवी प्राप्त केल्यानंतर गेली १० वर्षे (२००६ - २०१६) ते न्यूयॉर्क, अमेरिका येथे व्यवसायनिमित्त राहत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून हर्षल विभांडिक यांनी लोकसहभागातून जिल्हा परिषद शाळांचे संगणकीकरण करण्याचा ध्यास घेतला. –ाा ध्यासातून धुळे जिल्हयात त्यांनी आतापर्यंत २३४ प्रेरणासभा घेतल्या आहेत तसेच महाराष्ट्राच्या २१ जिल्ह्यांतून प्रवास केला आहे. प्रामुख्याने शिक्षक, पालक, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ –ांना या कामात सहभागी होण्यासाठी प्रेरित करण्याचे कार्य ते या प्रेरणा सभांच्या माध्यमातून करत आहेत.

धुळे जिल्हयात ४ तालुक्यांमधील ८७ गटांमध्–ो ११०३ सरकारी शाळा आहेत. एका गटात सरासरी १०-१५ शाळा आहेत. हर्षल विभांडिक यांनी सर्व गटांना भेटी दिल्या. या भेटीत त्यांनी शाळेच्–ाा शिक्षकांचे विचार, ग्रामस्थांची निधी संकलनाची क्षमता व तेथील विजेची उपलब्धता –ाा गोष्टी समजून घेतल्–ाा.

शाळेचे वर्ग संगणकीकृत करण्यासाठी या गोष्टी खूप आवश्यक होत्या. निधी संकलनासाठी स्वत: हर्षल यांनी १९८ प्रेरणा सभा एकट्–ा धुळे जिल्हयात घेतल्या. शिक्षक, ग्रामस्थ, सामाजिक संस्था यांच्या सहभागातून व सहकार्यातून धुळे जिल्हयात एकूण ७.५ कोटी रुपये त्यांनी जमा केले आणि संपूर्ण जिल्हयांतील ११०३ शाळांमधून संगणकीकृत वर्गाचे ध्येय पूर्ण करण्यात आले.

–ा वाटचालीत प्रबोधिनीने २९ डिसेंबर २०१५ रोजी धुळे जिल्हयात जिल्हा स्तरीय प्रेरणा सभा आयोजित केली होती. या प्रेरणा सभेत संपूर्ण जिल्हयातून १४०० हून अधिक शिक्षक व अधिकारी सहभागी झाले होते. प्रेरणा सभेतून शिक्षकांना प्रेरणा तर मिळालीच पण हे कार्य आपण प्राधान्याने करायचे कार्य आहे ही त्यांची मानसिकता बनली. प्रबोधिनीचे डॉ.विनय सहस्रबुद्धे आणि रवींद्र साठे या प्रेरणा सभेला पूर्णवेळ उपस्थित होते.

प्रबोधिनीचे डॉ.विनय सहस्रबुद्धे यांच्या उपस्थितीत २३ जुलै, २०१६ रोजी सोनगीर येथील जिल्हा परिषदेच्या मुलींसाठी असलेल्या ऊर्दू शाळेच्या अभ्यासक्रमाचेही संगणकीकरण पूर्ण झाले आहे.

धुळे जिल्हयाच्या यशस्वितेनंतर हर्षल यांनी महाराष्ट्राच्या २१ जिल्हयांतून ३६ प्रेरणा सभा घेतल्या. त्या जिल्हयातील जिल्हा परिषदेचे शिक्षक व ग्रामसेवक –ांचा सहभाग मिळवला. त्यातून ठाणे, हिंगोली व गोंदिया जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गांचे १००% संगणकीकरण झाले आहे.

### १.६ संरक्षण मंत्र–ांसमवेत संरक्षण तज्ज्ञांची चर्चा :

संरक्षण आणि सुरक्षा विषयात अभ्यास करणाऱ्यांसाठी प्रबोधिनीने १४ मे २०१६ रोजी भारत सरकारच्या संरक्षण मंत्र्यांसोबत संवादाचा उपक्रम योजला होता. दिल्लीत इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये झालेल्या या संवाद कार्यक्रमात १२ राज्यातील विविध विद्यापीठांमध्–े संरक्षण विषयाचा अभ्यास करणारे ३५ प्राध्–ापक सहभागी झाले होते. संरक्षण विषयाशी संबंधित विविध पैलूंवर या अभ्यासकांनी आपली मते, आपल–ा सूचना मांडल्या. संबंधित सरकारी विभाग, नोकरशाही (प्रशासन) आणि सुरक्षा दलांशी अभ्यासकांनी नियमित संपर्क ठेवला पाहिजे. त्यामुळे सुरक्षे संबंधातील विषयांवर योग्य प्रकारे चर्चा होऊ शकेल अशी अपेक्षा या संवाद कार्यक्रमात व्यक्त केली गेली, किंबहुना अशा सर्वांसाठी एक व्यासपीठ निर्माण करून –ावर नियमितपणे मंथन करता येईल असा विचार या संवादातून पुढे आला. पुणे –ेथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील वा–ा.सी. एन.सी. च–ा आंतरराष्ट्री–ा संबंध व धोरणात्मक सुरक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत परांजपे व संरक्षण विष–ाचे अभ्–ासक मानवेंद्र सिंह हे –ा का–र्क्रमाचे मुख्–ा सं–ोजक होते.

## २. अन्–ा उल्लेखनी–ा:

### २.१ –ाशदा ह्या संस्थेबरोबरचा सामंजस्–ा करार :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी संस्था (यशदा) यांच्याशी १८ मार्च २०१६ रोजी पुणे येथे एक सामंजस्य करार केला.

या सामंजस्य कराराअंतर्गत ज्या गोष्टी निश्चित झाल्या त्यापुढील प्रमाणे–

● सरकारी अधिकारी व कर्मचारी यांचे क्षमता संवर्धन आणि प्रशिक्षण.

● सरकारी योजना व कार्यक्रम –ांचा अभ्यास व त–ांचे मूल्यमापन.

या नंतर २०१६-१७ या वर्षात एकूण ३ कार्यक्रम योजण्यात आले होते.

● कौशल्य विकास संचालनालय आणि रोजगार व उद्योजकता विभागाच्या

'ड' श्रेणीच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण (या श्रेणीसाठी पहिल्यांदाच असे प्रशिक्षण योजण्यात आले.): ५ दिवसांच्या प्रशिक्षणात ५६ कर्मचारी सहभागी झाले होते.

● स्थानिक निधी अधिकाऱ्यांसाठी लेखा प्रक्रियेत दुहेरी नोंद करण्यासाठी प्रशिक्षण : चार दिवसीय प्रशिक्षण प्रत्येकी ४० अधिकाऱ्यांसाठी दोन वेळा योजण्यात आले होते.

### २.२ कौशल्-ा विकास प्रशिक्षण :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने मे २०१७ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांच्याशी सामंजस्य करार केला. समाजातील दुर्बल घटकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी हा करार प्रामुख्याने करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता (NSDC) अंतर्गत राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ हे ना नफा तत्त्वावर स्थापन करण्यात आले आहे. भारत सरकारचे विविध कौशल्य विकासाचे उपक्रम राबविण्याची जबाबदारी प्रामुख्याने या महामंडळाची आहे.

या सामंजस्य करारानुसार प्रबोधिनी देशभर कौशल्य विकासासाठी केंद्रे सुरू करत आहे. या वर्षात प्रबोधिनीने अशी दोन केंद्रे सुरू केली असून आत्तापर्यंत सौंदर्य व निरोगीपण या विषयावर ४८ जणांनी प्रशिक्षण घेतले आहे. पुढील वर्षात किमान ५०० युवकांना आरोग्य, कपडे, सौंदर्य व निरोगीपण, बँकिंग व वित्त विषयांत प्रशिक्षण देण्याचा संकल्प प्रबोधिनीने केला आहे.

या व्यतिरिक्त प्रबोधिनीने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, भारत सरकार आणि प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान -ाा अंतर्गतही काम करण्याचे निश्चित केले आहे.

### २.३ नेहरू -ुवा संघटन-राज्-ास्तरी-ा प्रशिक्षण :

भारत सरकारच्या युवा व क्रीडामंत्रालया अंतर्गत असलेल्या नेहरू युवा केंद्र संघटन या संस्थेच्या महाराष्ट्र व गोवा राज्यांतील जिल्हा समन्वयक व लेखापाल -ांच्-ाासाठी १-३ सप्टेंबर २०१६ या कालावधीत प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात प्रशिक्षण योजण्यात आले होते. एकूण ३१ प्रतिनिधी या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणाचे तंत्र व पध्दती, दस्तावेजीकरण व निवेदन (अहवाल/वृत्त लेखन), माहिती-तंत्रज्ञान, माध्यमे व जनसंपर्क, स्वयंसेवी कार्याची प्रसिध्दी व सहभाग, प्रकल्प लेखन, भारतीय घटना व सरकार अशा विविध विषयांवरील सत्रे योजण्यात आली होती.

सर्वश्री संदीप माटे, पी.पी.हिंगे, नील सोमय्या, भूषण लवांदे, विवेक अत्रे, चंद्रकांत घाग, रवींद्र साठे, डॉ. वनिता बंजन, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्-ाा महापौर गीता जैन आणि राणी द्विवेदी या मार्गदर्शकांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

### २.४ शैक्षिक परिदृष्-ा - चिंतन बैठक :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेतून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चिंतन बैठक ४-५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात योजण्यात आली होती.

विद्यालयीन पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक, शिक्षक प्रशिक्षण, मूल्यशिक्षण व व्यक्ती निर्माण, शिक्षण प्रणाली, सामाजिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने शिक्षण व्यवस्था, शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शासनाशी संपर्क व

संवाद अशा महत्त्वाच्या विषयांच्या अनुषंगाने ही चिंतन बैठक योजण्यात आली होती. शिक्षण संस्था व भारतीय जनता पार्टी शासित राज्यांचे शिक्षण मंत्री मिळून सुमारे ६५ प्रतिनिधी या बैठकीस पूर्णवेळ उपस्थित होते. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर तसेच राष्ट्री-ा स्व-ांसेवक संघाचे सहसरका-ावाह सुरेश सोनी व डॉ. कृष्ण गोपाल तसेच सरका-ावाह भ--ााजी जोशी या बैठकीत उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारती-ा संपर्क प्रमुख व प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा.अनिरुद्ध देशपांडे यांनी या बैठकीचे आयोजन केले होते. भय्याजी जोशी यांच्या मार्गदर्शनाने बैठकीचा समारोप झाला.

### २.५ संपादक, पत्रकार, लेखक -ांची संवाद सभा :

साहित्यिकांना आणि संपादकांना चर्चेसाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने संवाद सभेचा उपक्रम २०१४ साली सुरु केला. यंदा दिवंगत डॉ. अरुण टिकेकर यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ही संवाद सभा २,३ जुलै २०१६ -ाा कालावधीत आयोजित करण्यात आली होती. प्रबोधिनीच्या संकुलात झालेल्या या संवाद सभेला साहित्य, पत्रकारिता, प्रकाशन या क्षेत्रातील ४७ नामवंत उपस्थित होते. या संवाद सभेचे उद्घाटन डॉ. मनीषा टिकेकर व प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. अरुण टिकेकर-वसा आणि वारसा या परिसंवादात डॉ. मनीषा टिकेकर, संजीवनी खेर, शुभदा चौकर व श्रीकांत बोजेवार यांनी सहभाग घेतला होता. डॉ. मनीषा टिकेकर यांनी डॉ. अरुण टिकेकरां बरोबरचे आपले अनुभव कथन करताना त्यांच्या उपजत लेखणीला उजाळा दिला. 'आधुनिक लेखन माध्यम: ब्लॉग आणि फेसबुक' या दुसऱ्या सत्राच्या परिसंवादामध्ये आशुतोष जावडेकर, दीपक पवार, विजय चोरमारे आणि मुकेश माचकर यांनी सहभाग घेतला. सदर विषयावर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली आणि साहित्य निर्मिती करताना ब्लॉग आणि फेसबुक -ांचा वापर कसा होईल याचे महत्त्व पटवून देण्-ाात आले.

'संवाद अंबरीश मिश्र यांच्याशी' -ाा सत्रात रवींद्र मांजरेकर आणि मृणालिनी नानिवडेकर यांनी अंबरीश मिश्र यांची सहज हसत खेळत मुलाखत घेतली. चित्रपट सृष्टी आणि चित्रपट सृष्टीशी नाते कसे बहरते ? मराठी, हिंदीवर असणारी जबरदस्त पकड, सहज सुंदर लिखाणामागचे रहस्य ह्या बाबी अंबरीश मिश्र यांनी आपल्-ाा मुलाखतीत उलगडून दाखविल्-ाा. सध्-ााच्या 'ई-बुक्सच्या काळात छापील पुस्तकांचे भवितव्य' या विषयावरील परिसंवादात मिलिंद परांजपे, संजय भास्कर जोशी, समीर धामणगावकर, अनय जोगळेकर यांनी चर्चा घडवून आणली. या चर्चेतून सध्-ाा साहित्य क्षेत्रात ई-बुक्स चा प्रभाव वाढत आहे असे निदर्शनात आणले. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांची खासदारकीपदी नियुक्ती झाल्यामुळे संवाद सभेत त्यांचा सत्कार व वैचारिक, कौटुंबिक अशी त्-ांची मुलाखत घेण्यात आली. एकूणच या संवाद सभेत, विविध विषयांवर चर्चा झाली. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढत असल्-ाामुळे मराठी लेखक, पत्रकार, प्रकाशक यांनी मराठी सांस्कृतिक विश्वाच्या वाटचालीची चिंता व्यक्त केली आणि मराठी भाषेची प्रगती होण्यासाठी काही ठोस उपाय करता येतील का ? यावर विचारविनिमय करण्यात आला.

### २.६ पुणे विभाग-टपाल निरीक्षक प्रशिक्षण :

प्रबोधिनीच्यावतीने टपाल खात्यातील निरीक्षकांसाठी पहिल्यांदाच प्रशिक्षण योजण्यात आले होते. हे प्रशिक्षण पुणे विभागातील टपाल निरीक्षकांसाठी १७,१८

जून २०१६ या कालावधीत पुणे येथे योजण्यात आले होते आणि या प्रशिक्षणात ६० टपाल निरीक्षक सहभागी झाले होते. साहाय्यक पोस्ट मास्तर जनरल एफ.बी.सय्यद यांनी प्रशिक्षणाचे उद्‌घाटन केले.

पोस्ट मास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांनी निरीक्षकांची भूमिका व जबाबदारी या विषयावर सहभागी निरीक्षकांना मार्गदर्शन केले.

प्रबोधिनीच्या मानद संचालिका डॉ.अरुणा कौलगुड यांनी स्व-सजगता व स्वोट ॲनालिसीस या सत्रांमधून निरीक्षकांसमोर मांडणी केली. प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी संवाद कौशल्य विषय मांडला तर ज्येष्ठ व्यवस्थापन तज्ज्ञ शाम भुर्के यांनी वेळेचे नियोजन व कार्यसंस्कृती या सत्रांमध्ये सहभागींना मार्गदर्शन केले.

परस्परसंबंध व समूह बांधणी या सत्रात अनुराधा देशपांडे यांनी मार्गदर्शन केले तर सकारात्मक विचार व आनंदीपणा हा विषय शर्मिला ओसवाल यांनी सहभागींना समजवून सांगितला.

गणेश सावळेश्वरकरांच्या मार्गदर्शनाने या प्रशिक्षणाचा समारोप झाला.

### २.७ अंत्योदय पुरस्कार २०१६ :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने आणि मुंबईतील कै. डी.एच.गोखले व शामला गोखले न्यास पुरस्कृत 'अंत्योदय पुरस्कार' प्रदान सोहळा मंगळवार, दि. ५ एप्रिल, २०१६ रोजी साजरा झाला. समाजाच्या तळागाळातील, वंचित घटकांच्या उत्थानासाठी संस्थेच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार १९९९ पासून देण्यात येतो. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन त्‍या व्‍यक्तीला गौरविण्यात येते तर संस्थेला रु. १,००,०००/- रोख रक्कम प्रदान केली जाते. २००६ पासून सेरेब्रल पाल्सी ग्रस्तांसाठी संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र -या संस्थेच्या माध्यमातून लातूर शहरात कार्य करणाऱ्या सुरेश मनोहर पाटील यांना -ंदा हा पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे होते. तर डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय ओक हे प्रमुख पाहुणे होते. डॉ. संजय ओक यांच्या हस्ते सुरेश पाटील यांना पुरस्कार सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. तर गोखले न्यासाच्या कार्यवाह चंदा गोखले यांच्‍या हस्ते सुरेश पाटील यांना पुरस्कार रक्कम रु. १ लाख प्रदान करण्यात आली.

सुरेश पाटील यांनी सत्काराला उत्तर देताना आपले मनोगत व्यक्त केले. या कार्याची सुरुवात का आणि कशी झाली ? हे सांगताना त्यांनी आपला स्वत:चाच मुलगा या आजाराने ग्रस्त असल्‍यामुळे नैराश्याची अवस्था आली होती पण निराश होऊन प्रश्न सुटणार नाहीत या भावनेतून आपण आपल्या पत्नीसह हे कार्य सुरू केले असे सांगितले. या कामातून हे रुग्ण, त्यांचे पालक, समाजाची मानसिकता या सर्वांचे अनुभव घेत आज वाटचाल करत असताना खूप आनंद मिळत आहे असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

डॉ. संजय ओक स्वत: वैद्यकीय क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून अधिक काळ सक्रिय आहेत, स्वत: बालशल्यविशारद आहेत. या आजाराची गंभीरता, कुटुंबावर होणारे परिणाम, सामाजिक मानसिकता या पैलूंचा परामर्श तर त्यांनी घेतलाच, पण जगभरात वर्षात ८० लाख जणांना हा आजार होतो ही आकडेवारीही त्यांनी दिली. या आजाराने ग्रस्त असलेल्या काहींनी जी अवर्णनीय कामे केली आहेत

त्याचेही दाखले त्–ांनी दिले. या व्याधीने ग्रस्त असलेल्या मुलांसाठी सर्वस्व पणाला लावून काम करणाऱ्या सुरेश पाटील यांच्या सारख्या कार्यकर्त्यांची समाजाला मोठी गरज असल्याचे सांगून त्–ांनी उपस्थितांमध्ये सेवा भाव जागवला. वैद्यक क्षेत्रातील लोकांसाठी प्रबोधिनी काय करू शकते हे ही त्यांनी सूचित केले.

अरविंद रेगे यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यात ज्यांचा हातभार लागला त्यांचे आभार गोखले न्यासाच्या चंदा गोखले यांनी मानले. पसायदानाने पुरस्कार सोहळा समाप्त झाला.

## ३. प्रशिक्षण:

### ३.१ सागरी सुरक्षा कार्यशाळा :

मुंबईतील डॉ. शामाप्रसाद मुखर्जी स्मृती या संस्थेच्या सहयोगाने म्हाळगी प्रबोधिनी गेल्या तीन वर्षांपासून सुरक्षा विषयक प्रशिक्षण आयोजित करत आहे. यंदा दि. २–३ एप्रिल, २०१६ रोजी 'सागरी सुरक्षा' या विषयावर कार्यशाळा योजण्यात आली होती. भारताचा असलेला मोठा सागरी किनारा व सागराशी संबंधित अन्य पैलूंच्या अनुषंगाने असणारे विविध प्रश्न सरकारी क्षेत्रात चर्चिले जातात. सरकारचे विविध संबंधित विभाग यात सातत्याने उपा–ा–ोजना करतही असतात. मात्र नागरिकांची व सामाजिक संघटनांची जबाबदारी देखील तितकीच महत्त्वाची आहे.

गेल्या काही वर्षांत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घडामोडी, भारताचा विशाल समुद्रकिनारा, भारताचे भौगोलिक स्थान आणि जगभर वेगाने होणाऱ्या प्रगतीमुळे निर्माण झालेली आव्हाने या सर्व बाबींचा विचार करून नागरी समाजात या विषयाची तोंडओळख होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणूनच प्रबोधिनीने सागरी सुरक्षा विषयावर कार्यशाळा योजली होती.

डॉ. श्रीकांत परांजपे, संचालक–वा–ा.सी.एन.सी., सावित्रीबाई फुले विद्यापीठ: आंतराष्ट्री–ा संबंध आणि धोरणात्मक सुरक्षा हे या अभ्यासक्रमाचे संचालक होते. या कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय तटरक्षक दलाचे माजी महासंचालक डॉ. प्रभाकरन पालेरी यांनी केले. आपल्या विषय मांडणीत त्यांनी समुद्र, समुद्र किनारा, त्याचे विविध पैलू आणि करावयाच्या गोष्टी सहज शब्दात सहभागींसमोर मांडल्या. भारतीय सागरी हद्दीत अनेकजण आपले हितसंबंध जपण्याचा वा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हा विषय डॉ. श्रीकांत परांजपे यांनी नेमक्या शब्दांत मांडला. पारंपरिक सुरक्षेपुढील आव्हाने हा विषय दोन सत्रांमधून डॉ. श्रीकांत परांजपे व निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी मांडला. महाजन यांनी वर्तमान आव्हाने, वर्तमान सागरी सुरक्षांची स्थिती, भारतीय नाविक दल, तटरक्षक दल, पोलीस या सर्वांची भूमिका, २६/११ पासून मिळालेले बोध या अनुषंगाने विषयाची मांडणी केली. वेगवेगळ्या समाजांची भूमिका, मासेमारी, दळणवळण यांबाबतच्या आव्हानांच्या स्थितीची मांडणी त्यांनी सहभागींसमोर केली. कॅप्टन आनंद दीक्षित यांनी अपारंपरिक आव्हानांचा विषय मांडला. त्यांच्या विवेचनात आंतरराष्ट्रीय सामुद्रिक कायदे, ईईझेड, शास्त्रीय संशोधन, वाद विवाद सोडविण्याच्या पद्धती अशा विविध पैलूंचा समावेश होता.

महाराष्ट्राच्–ाा सागरी सुरक्षे संदर्भात विद्याधर मालेगावकर यांनी तपशीलवार मांडणी केली. क्षेत्रीय पाणी, सुरक्षित किनारा, सामुद्रिक आतंकवाद, अवैध मासेमारी, प्रदूषण, सागरी सीमा विवाद अशा विविध अंगांनी त्यांनी हा विषय सहभागींना समजावून सांगितला. नाविक दलाचे निवृत्त कमांडर उल्हास गुप्ते

यांनी पोलीस दल, नागरिक दल, तटरक्षक दल यांची सागरी सुरक्षेबाबतची भूमिका, त्यांची रचना या विषयांची मांडणी केली.

डॉ. श्रीकांत परांजपे यांनी या कार्यशाळेचा समारोप करताना नागरी व व्यावसायिक जगताची भूमिका काय या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत ३७ पुरुष व ३ महिला मिळून एकूण ४० प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## ३.२ शासकीय योजनांविषयक कार्यशाळा :

महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी शासकीय योजना विषयावर प्रबोधिनीच्यावतीने कार्यशाळेची योजना करण्यात आली होती. दि. २८-२९ एप्रिल, २०१६ या कालावधीत योजलेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्रातील २० जिल्हयांमधून १४३ पुरुष व ६ महिला असे एकूण १४९ कार्यकर्ते सहभागी झाले होते. राज्य व केंद्र सरकारच्या विकासाच्या प्रमुख विषयातील योजनांची माहिती कार्यकर्त्यांना व्हावी या उद्देशाने कार्यशाळेची रचना करण्यात आली होती. भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेशाचे संघटन मंत्री प्रा. रवींद्र भुसारी यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. कार्यशाळेमध्ये शेती, पर्यावरण, वनविभाग, स्वयंरोजगार, आदिवासी कल्याण, महिला व बालकल्याण, स्टार्ट-अप, कौशल्य विकास, युवा व क्रीडा विभाग तसेच नाबार्डच्या विविध योजनांबद्दल माहिती देण्यात आली. योजनांची माहिती देतानाच त्या योजना प्राप्त करण्यासाठी संस्थांना कराव-ाा लागणा-ाा औपचारिक बाबींबद्दलही माहिती दे-ाात आली. या योजनांमागचा उद्देश समजून घेत अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने व आवश्यक तिथेच शासकीय योजनांचा लाभ घेतला तर कमी वेळेत व कमी पैशांत देशाचा समग्र विकास होईल हे प्रत्येक मार्गदर्शकाने आवर्जून सांगितले.

डॉ. मेधा सोमय्या, संतोष गुप्ता, डॉ. भालचंद्र साठ्ये, विवेक अत्रे, नाबार्डचे अधिकारी उदय शिरसाळकर इत-ाादि अनुभवी व अभ्यासू मार्गदर्शकांनी विविध सत्रांमधून सहभागींना मार्गदर्शन केले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क प्रमुख प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांच्या मुख-ा उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला.

## ३.३ सामाजिक संस्थांच्या कार्यात माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग : प्रशिक्षण शिबिर :

सामाजिक क्षेत्रात अनेक विषयांवर विकासाची व पुनरुत्थानाची कामे सुरू आहेत. सामाजिक संस्थांचे मूल्यांकन होऊन त-ांच-ाा कार्यपद्धतीचे विकसन व्हावे तसेच त्यांची पारदर्शिता वाढवण्याच्या दृष्टीने माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करून नियोजनपूर्वक कार्य करण्याबाबत संस्थांची मानसिकता निर्माण करावी -ाा हेतूने प्रबोधिनीच्यावतीने दि. ९-१० जुलै, २०१६ या कालावधीत 'सामाजिक संस्थांच्या कार्यात माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग' या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्राच्या ७ जिल्ह्यांमधून १५ पुरुष आणि १ महिला असे एकूण १६ प्रतिनिधी सहभागी झाले होते. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ शशांक टिळक हे या प्रशिक्षण शिबिराचे अभ्यासक्रम संचालक होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या विशेष कार्य अधिकारी (माहिती-तंत्रज्ञान) निधी कामदार यांनी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन केले. सामाजिक क्षेत्रात काम करताना आपल्या संस्थेचे कार्य आपल्या संबंधातील विविध घटकांपर्यंत

पोहोचवण्यासाठी संस्थेची वेबसाईट आणि सोशल मीडियावरील अस्तित्व का गरजेचे आहे हे 'इंटरनेट व वेबसाईटची आवश्यकता' या सत्रात शशांक टिळक यांनी मांडले. तसेच या अनुषंगाने 'मुख्य घटक व माहिती तंत्रज्ञानाची उपयोगिता' व 'माध्यमांबाबत तत्परता व निरंतर अद्ययावतीकरण' या दोन्ही सत्रांत सामाजिक संस्थांसोबत कार्य करणाऱ्या निरनिराळ्या घटकांना माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात कसे सामावून घेता येईल, आपल्या कार्याची अद्ययावत माहिती परिणामकारक रितीने कशी पोहोचविता येईल याचे विस्तृत विवेचन शशांक टिळक यांनी सहभागींसमोर केले.

'इंटरनेट युगातील वैश्विक आवाहन आणि पारदर्शिता' हया सत्रात माहिती-तंत्रज्ञानाचे अभ्यासक अनय जोगळेकर यांनी सांगितले की जागतिक स्पर्धेत संस्थांना जगासोबत वावरण्याची चांगली संधी माहिती-तंत्रज्ञानामुळे मिळाली आहे.

'गरजांच्या पूर्ततेसाठी तंत्रज्ञान' आणि 'वेबसाईटचा सर्वंकष उपयोग व परिणामकारकता' या दोन्ही सत्रांतून न्यूज भारती डॉट कॉमचे मुख्य संपादक मिलिंद आरोलकर यांनी मार्गदर्शन केले.

### ३.४ शैक्षणिक संस्था : विश्वस्त प्रशिक्षण शिबिर :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने महाराष्ट्रातील 'शैक्षणिक संस्थांच्या विश्वस्तांसाठी' दि. १६-१७ जुलै, २०१६ या कालावधीत प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते. या शिबिरात १९ शैक्षणिक संस्थांतर्फे २५ पुरुष ५ महिला असे एकूण ३० प्रतिनिधी सहभागी झाले होते.

शिबिराचे उद्घाटन प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांनी केले. 'विश्वस्त : भूमिका आणि जबाबदारी' या विषयावर उद्घाटन सत्रात त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

विश्वस्त हे संस्थेचे मालक नसून दिशा देणारे आहेत. संस्थेची धोरणे ठरवताना संस्थेच्या दैनंदिन कारभारात विश्वस्तांनी अनावश्यक लक्ष घालू नये, असे त्यांनी आपल्या विवेचनात सांगितले. प्रबोधिनीच्या नेतृत्व अध्ययन व संस्था बांधणी केंद्राच्या मानद संचालिका डॉ. अरुणा कौलगुड यांनी 'संस्था बांधणी आणि दृष्टी व ध्येय' या दोन सत्रांतून सहभागींना मार्गदर्शन केले. संस्थेची कामे कोणती आहेत, संस्थेसमोर आव्हाने काय आहेत, अशा विविध पैलूंच्या आधारे त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. ही संस्था धर्मादाय आयुक्तालयात नोंदणीकृत असल्यामुळे धर्मादाय आयुक्तालय तसेच राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विविध कायद्यांच्या चौकटीत ती काम करत असते. त्यामुळेच या सर्व कायद्यांची पूर्तता संस्थेने केली पाहिजे व आवश्यक ती कागदपत्रे जपूण ठेवली पाहिजेत असे त-ांनी सांगितले. या विषयाचे महत्त्व 'कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता' या सत्रातून श्रीराम पटवर्धन यांनी सर्वांसमोर मांडले.

विद्यार्थ्यांना विषयाची गोडी लागावी व त्यांनी विषय नीटपणे आत्मसात करावा या भूमिकेतून 'ज्ञान रचनावाद' ही संकल्पना पुढे आली. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती हे जरी खरे असले तरी शिक्षण क्षेत्रात या विविध प्रवृत्तींना शिकवताना सर्वांपर्यंत, त्यांच्या आकलन क्षमतेनुसार विषय पोहोचविण्याची अपेक्षा या ज्ञान रचनावादात आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्यातील शालेय विभागाच्या विशेष कार्यकारी अधिकारी प्राची साठे यांनी या सत्रात मार्गदर्शन केले. या विषयाबरोबरच शासन व संस्था : समन्वय या विषयावरही त्यांनी सहभागींना

मार्गदर्शन केले. मुंबईतील गोखले महाविद्याल-ााचे निवृत्त प्राचार्य आणि मुंबई ग्राहक पंचायतचे वर्तमान अध्यक्ष डॉ.रामदास गुजराथी यांनी 'समूह बांधणी' विषय समजावून सांगितला. विश्वस्त मंडळाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीने आपल्या संघात कोणकोणत्या प्रकारची माणसे आवश्यक आहेत याचा नीट विचार केला पाहिजे, त्यानुसार माणसे हुडकून आपल्या विश्वस्त मंडळात ती घेऊन एक सक्षम विश्वस्त मंडळ संस्थेच्या कल्याणासाठी बनवले पाहिजे, अशी मांडणी त्यांनी आपल्या सत्रातून केली.

**प्रबोधिनीच्-ाा वतीने -ाोजलेल्-ाा काही प्रशिक्षण का-ार्क्रमांची तपशीलवार माहिती वर दिली आहे त्-ााव्-ातिरिक्त झालेले अन्-ा का-ार्क्रम पुढील प्रमाणे :**

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २-३ जुलै, २०१६ | चेंबूर एज्युकेशन सोसायटी, संस्था कार्यकारी मंडळ कार्यशाळा | १२ |
| २ | ५-९ जुलै, २०१६ | भारतीय जनता पार्टी, छत्तीसगढ, कुरुद विधानसभा, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ५६ |
| ३ | २७ ऑगस्ट, २०१६ | टेन्शन कायकू लेने का? | ३४ |
| ४ | २२-२३ ऑक्टोबर, २०१६ | प्रकल्प प्रस्ताव लेखन प्रशिक्षण शिबिर | २३ |
| ५ | १२-१३ नोव्हेंबर, २०१६ | शिक्षक क्षमता संवर्धन प्रशिक्षण शिबिर | २६ |
| ६ | २५-२६ फेब्रुवारी, २०१७ | वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये प्रशिक्षण शिबिर | ४६ |
| ७ | ३१ मार्च, १-२ एप्रिल, २०१७ | हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम | ४१ |

**३.५ भारतीय जनता पार्टी : पं. दीनद-ााळ उपाध्-ाा-ा महाप्रशिक्षण अभि-ाान**

भाजपाच्या केंद्रीय स्तरावरील पं. दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियाना अंतर्गत जिल्हावार प्रशिक्षणांची मालिकाच प्रबोधिनीच्या संकुलात योजण्यात आली होती. अहवाल वर्षात भारतीय जनता पार्टीचे प्रशिक्षण व अंतर्गत बैठका असे एकूण १८ उपक्रम झाले. त्-ााचा तपशील पुढील प्रमाणे :

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २३-२४ एप्रिल, २०१६ | भारतीय जनता पार्टी, रायगड जिल्हा : पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर | ७३ |
| २ | १५-१६-१७ मे, २०१६ | भारतीय जनता पार्टी, गोवा प्रदेश : आमदार प्रशिक्षण वर्ग | २९ |
| ३ | १६-१८ जुलै, २०१६ | भारतीय जनता पार्टी, सोलापूर ग्रामीण जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ११० |
| ४ | २९-३१ जुलै, २०१६ | भारतीय जनता पार्टी, वसई-विरार शहर जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ११८ |
| ५ | ६-७ ऑगस्ट, २०१६ | भारतीय जनता पार्टी, उत्तर मुंबई जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | १४० |
| ६ | ८-१० ऑगस्ट,२०१६ | भारतीय जनता पार्टी, रत्नागिरी जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | १६० |
| ७ | १२-१३ ऑगस्ट, २०१६ | भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश : का-िकर्ता प्रशिक्षण शिबिर | २४० |
| ८ | १५-१७ ऑगस्ट, २०१६ | भारतीय जनता पार्टी, भिवंडी जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | १२१ |
| ९ | २४-२५ ऑगस्ट, २०१६ | भारतीय जनता पार्टी, जळगाव ग्रामीण जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ३०० |
| १० | ३०-३१ ऑगस्ट, २०१६ | भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश : अल्पसंख्यांक मोर्चा का-िकर्ता प्रशिक्षण वर्ग | २४४ |
| ११ | १२-१३ सप्टेंबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी, महिला मोर्चा, रायगड जिल्हा :कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ७१ |
| १२ | १८-१९ सप्टेंबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी, बीड जिल्हा : का-िकर्ता प्रशिक्षण शिबिर | २५० |
| १३ | २२-२४ सप्टेंबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी,कल्याण-डोंबिवली शहर जिल्हा : का-िकर्ता प्रशिक्षण शिबिर | १२३ |
| १४ | २८ सप्टेंबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी, राष्ट्रीय महिला मोर्चा,पदाधिकारी बैठक | ३५ |
| १५ | १४-१६ ऑक्टोबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | १५९ |
| १६ | १४-१५ डिसेंबर, २०१६ | भारतीय जनता पार्टी, महिला मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | २१८ |
| १७ | १७-१८-१९ जानेवारी, २०१७ | भारतीय जनता पार्टी, लातूर शहर जिल्हा : कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | २२३ |
| १८ | १५-१६-१७ मार्च, २०१७ | भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर जिल्हा : जिल्हा परिषद सदस्य प्रशिक्षण शिबिर | ४६ |

## ४. प्रबोधन :

### ४.१ बाळासाहेब देवरस : कर्तृत्व आणि विचार-रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने दि. २८ जुलै, २०१६ रोजी पुणे येथे ११ वे रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान योजण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक स्व. बाळासाहेब देवरस यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'बाळासाहेब देवरस: कर्तृत्व आणि विचार' या विषयावर योजलेल्या या व्याख्यानास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी मुख्य वक्ते होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे होते. पुणे महानगराचे संघचालक रवींद्र वंजारवाडकर हे या प्रसंगी उपस्थित होते.

सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी स्व. बाळासाहेबांचे जीवन म्हणजे संघाचा इतिहास आहे हे सांगतानाच बाळासाहेबांचे विचार, त्‍यांची स्मरणशक्ती, त्‍यांचे व्यासंगीपण, त्‍यांची सर्वसमावेशकता, निर्णय क्षमता या पैलूंवर प्रकाश टाकत, बाळासाहेबांच्या राष्ट्रसमर्पित वृत्तीचीही अनेक उदाहरणे देऊन उपस्थितांना संबोधित केले. दुरून बाळासाहेबांना पाहून मत बनविणाऱ्यांचे मतपरिवर्तन प्रत्यक्ष त्यांना भेटल्यावर होत असे हे भय्याजींनी सोदाहरण सांगितले. बाळासाहेबांचा अनेक विषयांवरचा अभ्यास विशेषत: युद्धशास्त्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी य‍ांवरील अभ्यास हा अचंबित करणारा होता. सामाजिक क्षेत्रात सक्रिय होण्याची संघटनेची सुरूवात बाळासाहेबांच्या आधीपासून झालेली असली तरी तिला गती देण्याचे कार्य बाळासाहेबांनी जाणीवपूर्वक केले. हिंदू समाजाची वाटचाल विभिन्न भेदातून एकात्मतेच्या दिशेने करण्यासाठी संघाच्या कार्यपद्धतीतून बाळासाहेबांनी अनेक प्रयोग केले. सामाजिक सद्भाव आणि समरसता या अनुषंगाने बाळासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी नामांतर चळवळीत केलेले प्रयत्नही भय्याजींनी सर्वांसमोर मांडले. प्रा. अनिरुध्द देशपांडे यांनी स्व. बाळासाहेबांच्या कार्याचे महत्त्व संक्षेपाने सर्वांसमोर मांडून बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी केले. रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यानाची संकल्पना व आत्तापर्यंत झालेल्या व्याख्यानांची माहिती देत त्यांनी या वर्षीच्या विषया मागची भूमिका मांडली. या कार्यक्रमात सुमारे ९०० जण उपस्थित होते.

### ४.२ चलन बदलातून देश परिवर्तन : परिसंवाद

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने शनिवार, दि. २६ नोव्हेंबर, २०१६ रोजी मुंबईतील इंडियन मर्चंटस् चेंबर मध्ये 'चलन परिवर्तनातून, देश परिवर्तन' या विषयावर एक परिसंवाद योजण्यात आला होता. भारताच्या पंतप्रधानांनी दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ५०० व १००० रुपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयामागची संभाव्य कारणे व निर्णयानंतर उद्‌भवलेली परिस्थिती या अनुषंगाने हा परिसंवाद योजला गेला होता.

नाशिक येथील आर्थिक विषयांचे अभ्यासक आणि टाईम लाइन द्वैमासिकाचे संपादक व विश्वस्त डॉ. विनायक गोविलकर, अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त अनिल शिंदे व मुंबईतील ज्‍येष्ठ लेखा परीक्षक आशिष शाह हे या परिसंवादात वक्ते म्हणून सहभागी झाले होते.

२६/११ला मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले सुरक्षा कर्मचारी व नागरिक यांना परिसंवादाच्या सुरुवातीला श्रद्धांजली वाहण्यात आली. या परिसंवादाचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे सचिव मंगल प्रभात लोढा यांनी केले. विनायक गोविलकर यांच्या विषय मांडणीने परिसंवादाची सुरुवात झाली. रिझर्व्ह

बँकेने ५ मे रोजी सर्व बँकांना १०० रुपयांच्या नोटा ए. टी. एम. मध्ये अधिक प्रमाणात ठेवण्याची सूचना बजावली होती. त्यानंतर २ नोव्हेंबर रोजी रिझर्व्ह बँकेने पुन्हा एकदा सर्व बँकांना ए. टी. एम. मधील १०० रुपयांच्या नोटांचे प्रमाण वाढवण्यास सांगितले. याचा अर्थ सहा महिन्यांपूर्वीच रिझर्व्ह बँकेने नोटा रद्द करण्–ाासाठीच्या तयारीला सुरुवात केली होती. त्यामुळे हा निर्णय एकाएकी घेण्यात आलेला नव्हता, हे यातून स्पष्ट होते असे प्रतिपादन डॉ. गोविलकर यांनी केले. नोटा बंदीचा निर्णय हा या कार्यक्रमातील अनेक निर्णयांच्या शृंखलेतला एक भाग असला तरी तो पहिला किंवा शेवटचा नक्कीच नाही, असेही डॉ. गोविलकर यावेळी म्हणाले.

नोटा रद्द करण्याचा निर्णय घेण्याअगोदर सरकारने पूर्व तयारी केली होती असे सांगताना ते म्हणाले, भारतातील बॅंकांबाबतची उदासिनता संपुष्टात आणण्यासाठी जन–धन योजनेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. १५ कोटी नागरिकांनी जन–धन योजनेअंतर्गत बँक खाती काढली. त्यामुळे कधीही बँकेत न गेलेल्यांनाही बँकेत जाणे, व्यवहार करणे परिचयाचे झाले. त्याचा फायदा आज नोटा रद्दच्या निर्णयानंतर होताना दिसत आहे, असेही ते म्हणाले.

अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त अनिल शिंदे यावेळी म्हणाले की, नोटा रद्दच्या निर्णयामुळे बाहेर आलेला पैसा ग्रामीण भागात वापरला जाईल, असे संकेत पंतप्रधानांनी दिले आहेत. तसे झाल्यास अनेक सरकारी योजनांच्या माध्यमातून हा पैसा ग्रामीण जनतेकडे वळता करण्यात येईल. त्याने श्रीमंत–गरीब, शहरी विकास व ग्रामीण गैरसोय ह्या द–ाा दूर होण्यास मदत होईल. कॅशलेस व्यवहाराच्या प्रवाहात देश आणखी पुढे जाईल.

तेव्हा आता चलनात आणण्यात आलेल्या २ हजाराच्या नोटा चलनातून कमी होण्याची शक्यताही त्यांनी यावेळी व्यक्त केली. या परिसंवादात आशिष शाह म्हणाले की, या निर्णयामुळे महागाई कमी होण्यास मदत होणार असून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याशिवाय व्याजदरात कपात झाल्याने फिजिकल गुडस्‌मधील मुदत ठेवींतली गुंतवणूक कमी करणे उचित ठरेल.

त्याऐवजी मुच्युअल फंडसारखी गुंतवणूक केल्यास ती अधिक फायदेशीर ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी उपस्थितांसोबत प्रश्नोत्तराचे सत्र घेतले आणि त–ाानंतर का–िक्रमाची सांगता करण्–ाात आली.

## ४.३ गुरुवार सभा

प्रबोधिनीच्या प्रबोधनात्मक उपक्रमात गुरुवार सभेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रबोधिनीच्या वडाळा येथील चंचल स्मृती कार्यालयात गेल्या १८ वर्षांपासून हा उपक्रम नियमितपणे सुरू आहे. सामाजिक व राजकी–ा क्षेत्रात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांना अशा महत्त्वाच्या विषयांवर योग्य माहिती मिळावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे. प्रत्येक महिन्याच्या चौथ्या गुरुवारी हा उपक्रम योजला जातो. महिन्याभरात घडलेल्या एखाद्या सामाजिक, आर्थिक वा राष्ट्रीय घटना/प्रसंगाबाबत तज्ज्ञ/अभ्यासक व्यक्तीकडून त्या विषयाची मांडणी केली जाते. एकूण दीड तासाचा हा कार्यक्रम असतो व यामध्ये एक तास विषयाची मांडणी व्हावी व अर्धा तास प्रश्नोत्तरांसाठी राखून ठेवला जावा ही अपेक्षा असते.

## २०१६-२०१७ अहवाल वर्षातील गुरुवार सभांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | वक्ते | सहभागी |
|---|---|---|---|---|
| १. | २१ एप्रिल,२०१६ | लव्ह जिहाद | रवी बेलपाठक | १५ |
| २. | २६ मे,२०१६ | ऑगस्टा वेस्टलँड घोटाळा प्रकरणातील सत्य | सुनील गुप्ता | २५ |
| ३. | २३ जून,२०१६ | भारतातील शिक्षण पध्दतीमध्ये परिवर्तनाची आवश्यकता | अंकुर कक्कड | १५ |
| ४. | २१ जुलै,२०१६ | जागतिक अर्थकारण आणि भारत | डॉ.अभिजित फडणीस | १५ |
| ५. | २३ ऑग,२०१६ | जी.एस.टी. आणि सामान्य माणूस | मंगेश किनरे | १५ |
| ६. | २९ सप्टें.,२०१६ | पं. दीनदयाळ उपाध्याय: जीवन आणि कार्य | माधव भांडारी | ५५ |
| ७. | २०ऑक्टो.,२०१६ | वर्तमान घडामोडी आणि भारत-पाक संबंध | दिवाकर देशपांडे | २२ |
| ८. | २९ डिसें.,२०१६ | सुलभ डिजीटल व्यवहार | प्रतीक कर्पे | ३० |
| ९. | ३० मार्च,२०१७ | आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम | मधुबन पिंगळे | ३३ |

## गुरुवार सभेव्यतिरिक्त अन्य प्रबोधनाचे कार्यक्रम झाले ते खालीलप्रमाणे.

| क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | वक्ते | सहभागी |
|---|---|---|---|---|
| १. | १६ ऑगस्ट,२०१६ | स्व.ज.द.जोगळेकर श्रध्दांजली सभा | डॉ. अशोक मोडक,दिलीप करंबेळकर, अनुराधा खोत, रवींद्र साठे | ५५ |
| २. | १७ नोव्हें.,२०१६ | समान नागरी कायदा: काळाची गरज | ॲड. गणेश सोवनी | १५ |
| ३. | २७ फेब्रु.,२०१७ | स्वातंत्र्यवीर सावरकर: आजच्या संदर्भात | डॉ. अशोक मोडक | ७० |

## ५. संशोधन :

### ५.१ सामाजिक - आर्थिक आणि सुरक्षा स्थिती राजस्थान सीमेवरील अभ्यास अहवाल :

म्हाळगी प्रबोधिनी आणि पब्लिक पॉलिसी रिसर्च सेंटर (PPRC) -ांनी २९ मार्च २०१६ ते १६ एप्रिल २०१६ -ा कालावधीत सीमा सुरक्षा दल (BSF) -ांच्-ा सहका-ाने राजस्थान सीमा क्षेत्राचा अभ्यास केला. प्रामुख्याने सामाजिक आर्थिक विकासाच्या अनुषंगाने हा अभ्यास करण्यात आला. ४ सदस्यीय अभ्यासगटाने हा अहवाल तयार केला आहे. सर्वश्री स्वाती श्रीवास्तव, उज्ज्वल अग्रेन, अपर्णा श्रीवास्तव -ा अभ्-ासगटाचे सदस्-ा होते. राजस्थान सीमा ही तुलनेने शांत सीमा आहे. पण विशिष्ट भौगोलिकता, सामाजिक-सांस्कृतिक परंपरा, वर्तमान आर्थिक विकासाची वाटचाल या पार्श्वभूमीवर या क्षेत्राची क्षमता व सुरक्षा -ा दृष्टीने अभ्यास करणे आवश्यक होते. त्याच बरोबर सीमा क्षेत्रातील जनतेला व सुरक्षा दलांना कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागते हे ही समजून घेण्याची आवश्यकता होती. या सर्वांच्-ा अनुषंगाने स्थानिकांची विकासाबद्दलची जाणीव, ओढ, समजून घेण्यास मदत झाली. प्रामुख्याने सीमा क्षेत्रासारख्या दूरस्थ क्षेत्राला, देशाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचे प्रश्न व देशाची एकात्मता या दोनही बाबींची सांगड घालण्याचा हा एक प्रयत्न प्रबोधिनीने केला. सीमावर्ती क्षेत्रातील गंगानगर, बिकानेर, जेसलमेर, बारमेर या चार जिल्हयांतील ४२ गावांना या अभ्यास गटाने भेट दिली. राज्य प्रशासन, सीमा सुरक्षा दल आणि अन्य कार्यरत संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला गेला. तसेच सुमारे २६२ कुटुंबांना भेटी देऊन सीमा क्षेत्रातील आर्थिक - सामाजिक स्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला.

जिल्हा परिषदांचे मुख्याधिकारी, जिल्हा दंडाधिकारी, नागरी संस्था, वक्फ, अल्पसंख्याक मंडळे, अल्पसंख्याक व गृह विभागाचे राज्य स्तरीय अधिकारी अशा विविध व्यक्तींच्-ा व विविध संस्थाच्-ा प्रतिनिधींच्या भेटी या अभ्यास गटाने घेतल्या.

चारही सीमावर्ती जिल्हयांतील जीवन, जीवनशैली, परिस्थिती यांवर या अभ्यास गटाला तपशीलवार माहिती मिळाली. सरकारी योजनांचा प्रभाव, स्थानिक समस्या, अडथळे यांबरोबरच या क्षेत्रातील शेती, पशुपालन आणि इतर विषय -ांचाही अभ्यास या गटाने केला.

या अभ्यासातून सांस्कृतिक व सुरक्षा -ांच्-ा दृष्टीने काही बाबी समोर आल्या. विशेषत: आंतरराष्ट्रीय सीमेवरच्-ा गावांमधील अनोंदणीकृत अल्पसंखाक संस्थांमध्-ो पायाभूत गुंतवणूक मोठया प्रमाणात होत असून काही प्रतिबंधित क्षेत्रांत विदेशी व्यक्तींकडून द्वेषमूलक व विभाजनवादी प्रवृत्तींना खत पाणी घातले जात आहे असे दिसून आले. पंजाब सीमेजवळ मादक द्रव्यांचा व्यापार प्रामुख्याने आढळून आला. या सर्व परिस्थितीत सुरक्षादलांसमोर काय आव्हाने आहेत हे कळण्यास मदत झाली आहे.

### ५.२ मीडिया पाठ्यवृत्ती पुरस्कार :

भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत **'स्वच्छ आसाम'** मोहिमेत सक्रिय योगदान देण्यासाठी प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी प्रेरित व्हावे यासाठी मीडिया पाठ्यवृत्ती पुरस्कार सुरू करण्यात आला.

मीडियातील स्वच्छता विषयाची जाण असणारे व सक्रियतेने काही करू शकणारे पत्रकार या पुरस्कारासाठी निवडण्याची प्रक्रिया आसाम सरकारने स्वच्छ भारत अभियानाला सुरुवात केल्या नंतर सुरू झाली. सार्वजनिक आरोग्य

अभियांत्रिकी विभागाने सरकारच्या वतीने तर जागतिक स्वच्छता निधीच्या वतीने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने या निवड प्रक्रियेची रचना केली. प्रबोधिनीने पुरस्कार निवडीसाठीची कार्यपद्धती तयार केली. स्व. नामांकन, अन्य नामांकने, आलेल्या अर्जाची छाननी, जिल्हा आणि राज्य स्तरांवरील पुरस्कारांचे निकष अशा अनुषंगाने ही कार्यपद्धती तयार करण्यात आली. मीडियातील संपादक, व्यावसायिक, सरकारी प्रतिनिधी, तज्ज्ञ अशा व्यक्तींची समिती बनवून पुरस्कारांसाठी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. विविध मार्गांनी आलेल्या एकूण ९०,००० अर्जांमधून अंतिमत:१३४ नामांकने पुरस्कारासाठी विचारात घेतली गेली आणि त्यांतून १९ जिल्हास्तरीय व ५ राज्यस्तरीय पुरस्कार १४-१५ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्-ाा का-र्क्रमात आसामचे मुख्यमंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## ५.३ 'मागेल त्याला शेततळे' योजनेचे मूल्यमापन :

राज्यातील कृषी सिंचनाची क्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दि.१७ फेब्रुवारी,२०१६ रोजी **'मागेल त्याला शेततळे'** हया महत्त्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ केला. हया योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या शेततळयांच्या भौतिक तपासणीसाठी तसेच मूल्यमापनासाठी राज्य शासनाने त्रयस्थ संस्था म्हणून रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची नियुक्ती केली होती. मार्च महिन्-ाात ही पहाणी पूर्ण झाली.

सुरुवातीस चंद्रपूर जिल्हयातील शेततळयांच्या पाहणीचे काम प्रबोधिनीकडे सोपविले. अहवाल वर्षात चंद्रपूर जिल्हयांतील १६४ शेततळयांच्या पाहणीचे काम पूर्ण झाले असून त्याचा अहवाल तयार केला आहे. तो शासनास सादर करण्यात येत आहे.

या अहवालात शेततळयांची उपयुक्तता ठळकपणे दिसून आली. लाभार्थी शेतकऱ्यांना पिकांच्या योग्य वाढीच्-ाावेळी आवश्यक ते संरक्षित पाणी मिळण्यासाठी या शेततळयांचा उपयोग झाला असून त्यांच्या शेती उत्पादनात तसेच उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. पाण्याच्या निश्चित उपलब्धतेमुळे पीक रचनेतही बदल घडून येत असल्याचे दिसले. ही योजना शेतकऱ्यांच्या हिताची असल्यामुळे लाभार्थींचा योजनेतील सहभाग चांगला दिसला.

चंद्रपूरच्-ाा पाठोपाठ आता पुणे जिल्हयातील बारामती आणि पुरंदर तालुक्यांतील ३२२ शेततळयांच्या पाहणीच्या कामास प्रारंभ होत आहे.

प्रबोधिनीच्यावतीने पुणे कार्यालयातून यशवंत ठकार हे मुख्य प्रकल्प समन्वयक म्हणून या प्रकल्पाचे काम पाहत आहेत.

